अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थाच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत.............

## महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९१/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ डिसेंबर,२००३

वाचा : (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लिक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८-ईएसटीटी (आरईएस), दिनांक १६ मार्च,१९९९.
(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग,क्रमांक-सीबीसी १२/२००२/२५२/प्रक्र-१/इमाव-५, दिनांक २५ जानेवारी,२०००.

EST. 25/12/2004

**प्रस्तावना** : माधुरी पाटील विरुध्द अप्पर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २.९.१९९४ रोजी निर्णय देतांना नियुक्तीपूर्वी सहा महिने अगोदर जातीचा दाखला पडताळून घेण्याबाबतचे निदेश दिलेले आहेत. तसेच अवर सचिव, भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १६.३.१९९९ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, नियुक्ती देतांना जातीच्या दाखल्याची योग्य ती पडताळणी व्हावी अशी शिफारस राष्ट्रीय अनुसूचीत जातीचा, जमाती आयोगाने केलेली आहे. ती शिफारस केंद्र शासनाने स्वीकारली असून, राज्य शासनाने त्यावर आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या आहेत. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागाने दिनांक २५ जानेवारी,२००० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदावर ज्या उमेदवारांची लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळ/समितीमार्फत शिफारस केलेली आहे. त्यांची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधीत विभागाने/कार्यालयाने जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबंधीत अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठीच्या जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत अशाप्रकारची तरतुद केलेली आहे. पडताळणी समितीला आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता उमेदवाराने केल्यानंतर तीन महिन्यात पडताळणी समितीने निर्णय द्यावयाचा असतो. तीन महिन्यात निर्णय दिला गेला नाही तर समितीच्या निर्णयाच्या अधीन राहून नेमणूक देण्याची तरतुद आहे. तात्पुरती नियुक्ती दिल्यानंतर यदाकदाचित जर जाती प्रमाणपत्र अवैध ठरल्यास संबंधीत कर्मचारी/ अधिका-याला सेवेतून काढून टाकण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- सीडीआर १०९३/१०७७/प्रक्र-२३/९३/अकरा, दिनांक १२ ऑक्टोबर,१९९३ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-सीडीआर १०९५/९९५/प्रक्र-३/९६/अकरा, दिनांक ३१ ऑक्टोबर,१९९६ अन्वये तरतुद केली आहे. या तरतुदी असतांना देखील अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या व्यक्तींवर / उमेदवारांवर अन्याय होतो म्हणून त्यांना न्याय मिळण्यासाठी काही ठोस उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

कृ.मा.प.

**शासन निर्णय** : शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे (Undertaking), सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हापरिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे/महामंडळ, शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळांसह), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह), सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/सहकारी सूत गिरण्या/बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणा-या शासन मान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर शिफारस झालेल्या/निवड केलेल्या उमेदवारांचे जाती प्रमाणपत्र तपासण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नियुक्ती प्राधिका-यांनी उमेदवारांना तात्काळ कळवावे व संबंधीत उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आंत संबंधीत प्राधिका-यांकडे करावी. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर विभागाने/कार्यालयाने तात्काळ संबंधीत जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने आवश्यक ती पूर्ण कागदपत्रे प्राप्त झाल्यावर सहा महिन्यांचे आंत निर्णय घ्यावा व संबंधीत विभागाने / कार्यालयाने जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती द्यावी. तसेच पदोन्नती देण्यात येणा-या सर्व अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या कर्मचारी / अधिकारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जाती दाव्याची तपासणी करण्यात यावी. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून कर्मचारी / अधिकारी यांच्या जाती प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये.

२. अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळेस तसेच पदोन्नतीच्या वेळेस जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जाती दाव्याबाबत वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात यावी. जाती दावा वैधता प्रमाणपत्र मिळण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. हे लक्षांत घेवून महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे नियमन) नियमावली, १९८२ च्या कलम ४ (२)(अ) नुसार सक्षम प्राधिका-याने मुदत वाढवून दिलेल्या कालावधीत उमेदवारांना हजर करुन घेण्यात यावे.

३. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(वि.वा.मेहेर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव,

कृ.पुढे पहा